# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०६/०४/२०१६

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्यांना विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कार्यवाही करण्याबाबत...

संदर्भ :- १. शासन पत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१५/ प्र.क्र.२२१/मावक, दि.०२/०३/२०१६

२. शासन पत्र आदिवासी विकास विभाग क्र.एसटीसी-२०१२/प्र.क्र.७१/का.१०, दिनांक १६/०३/२०१६

महोदय/महोदया,

राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमांमध्ये वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून लढविणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी काही मुदत दिली जाते. तसेच या निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या सदस्याने विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्यात यावे अशीही तरतूद करण्यात येते. त्यामुळे निवडून आलेल्या सदस्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या दाव्यावर संबंधित समितीने विहित कालमर्यादेत अंतिम निर्णय देणे आवश्यक असते. तसेच त्यासाठी महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या किंवा यथास्थिती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे सातत्याने पाठपुरावा करणे ही त्यांची जबाबदारी आहे.

२. उपरोक्त विषयासंदर्भातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागाच्या संदर्भांकित पत्राच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. त्या विभागांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या

समित्यांना याप्रकरणी आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. तरी मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरुन निवडून आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या जात पडताळणीच्या दाव्यांवर संबंधित समित्यांनी विहित कालमर्यादेत निर्णय घ्यावा यासाठी त्या समित्यांशी समन्वय साधून या प्रकरणातील अंतिम निर्णय त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात यावा व त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

आपला,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

२०५।७१५
१८.३.१६

**महाराष्ट्र शासन**

9/33
१७/३/१६

क्रमांक : सीबीसी-१०/२०१५/प्र.क्र.२२१/मावक
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ मार्च, २०१६.

प्रति,
महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

सर्व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत अधिनियमात करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ : राज्य निवडणूक आयोगाचे दि.४ फेब्रुवारी, २०१६ चे पत्र.

महोदय,

राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमांमध्ये अलिकडेच दुरुस्ती केलेली असून, त्याद्वारे अधिनियमात नमूद कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून लढविणा-या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जातप्रमाणपत्र पडताळणीसाठी, पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत किंवा याबाबतचा कोणताही पुरावा सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. तसेच निवडून आलेल्या सदस्यांनी ६ महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्दबातल होण्याची तरतूदही करण्यात आलेली आहे.

वरील परिस्थितीत अधिनियमातील उक्त तरतूदींची तंतोतंत अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या संदर्भांकित दि.४/२/२०१६ च्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्यांच्या जातप्रमाणपत्र पडताळणीच्या दाव्यावर शक्य तितक्या लवकर तसेच उशिरात उशिरा सदर सदस्य निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तरी त्या अनुषंगाने आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(संजय गुळेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -- उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकी इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई.

अतितातडीचे/महत्वाचे

# महाराष्ट्र शासन
## GOVERNMENT OF MAHARASHTRA

दूरध्वनी क्र. ०२२ २२७९३८८ / २२०४८७८९
Telephone No. ०२२ २२७९३८८८/२२०४८७८९
Fax ०२२-२२८३ ३६ ६५
फॅक्स क्र. ०२२ २२८३३६६५
Email: tddcamp@gmail.com

क्रमांक :एसटीसी-२०१२/प्र.क्र.७१/का-१०.
No.
आदिवासी विकास विभाग,
Tribal Development Department
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
Mantralaya Annexe, Mumbai - ४०० ०३२.

दिनांक - १६ मार्च, २०१६.

प्रति,

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन,
पुणे-४११ ००१

विषय :- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागात निवडून आलेल्या सदस्याने विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत अधिनियमात करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत -

संदर्भ:- मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१/का.५, दिनांक ४.२.२०१६.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राची प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमांमध्ये अलिकडेच करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून लढविणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी, पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत किंवा याबाबतचा कोणताही पुरावा सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. तसेच निवडून आलेल्या सदस्यांनी ६ महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्दबातल होण्याची तरतुदही करण्यात आलेली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या दाव्यावर संबंधित तपासणी समितीकडून सदस्य निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत अंतिम निर्णय घेतला जाणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने, सर्व संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या दाव्यावर सदस्य निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत अंतिम निर्णय घेण्याबाबत सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(ल.गो. ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत- वरीलप्रमाणे.

प्रत माहितीसाठी सादर -
१) सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई.